लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रात आठ मतदारसंघात मतदान होणार असून कालच्या छाननीत एकूण ३५२ उमेदवारांपैकी २९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यात नांदेडमधे सर्वाधिक ६६ अर्ज वैध ठरले आहेत. या टप्प्यात उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख ८ एप्रिल असून २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघामध्ये प्राप्त झालेल्या ३८ उमेदवारी अर्जांपैकी १८ अर्ज वैध ठरले आहेत. वंचित बहुजन आघाडीचे अभिजीत राठोड यांचा अर्ज अवैध ठरला आहे.

**<><><><><>**

कल्याण लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील,असं भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

भारतीय जनता पक्ष हा देशातील सर्वात मोठा सदस्य असलेला त्याचप्रमाणे सर्वात जास्त स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आमदार असणारा पक्ष आहे. या पक्षात कधीच फूट पडली नाही कारण या पक्षाचे कार्यकर्ते आत्मकेंद्री नाहीत असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपा आज ४४ वा स्थापना दिन साजरा करत आहे. भाजप स्थापना दिनानिमित्त आज मुंबई पक्ष कार्यालयात मुंबई शहर अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते

ध्वजारोहण झालं. यावेळी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. स्थापना दिनानिमित्त वांद्रे इथं बाईक रॅली काढण्यात आली.

स्थापना दिनानिमित्त भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पक्षाध्यक्ष जे पी नड्डा यांनी सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

मतदानविषयक जनजागृतीसाठी जागतिक पातळीवरचा सर्वात मोठा कार्यक्रम आज नागपूरच्या कस्तुरचंद मैदानावर झाला. नागपूर महानगरपालिका आणि नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यावेळी उपस्थितांना शपथ दिली. सुमारे आठ हजार मतदारांनी मतदान करण्याचा◌ी शपथ घेतली.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण विशेषतः महिला मतदारांचा सहभाग वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. यादृष्टीनं प्रत्येक मतदारसंघात संपूर्णपणे महिलांचं व्यवस्थापन असलेली मतदानकेंद्र उभारण्यात येत आहेत. राज्यात अशा प्रकारची ४४० मतदानकेंद्र असतील.

**<><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण अकोला लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

धाराशिव जिल्ह्यातल्या सुमारे दोन हजार ९९४ पूर्णांक ५४ हेक्टर शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद करत, ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी शासनाची आणि विमा कंपन्यांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात बीड जिल्ह्यातले १६, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले दोन, परभणी दोन, नांदेड एक, तसंच सोलापूर एक आणि धाराशिव जिल्ह्यातल्या एका सेवा केंद्राचा समावेश आहे. शासकीय जमिनीचे कोणतेही भाडेकरार किंवा संमतीपत्र नसतांना सुमारे एक हजार एकशे सत्तर शेतकऱ्यांच्या नावावर खोट्या नोंदी दाखवत हा पीक विमा या केंद्र चालकांनी भरला होता, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातल्या बोरज - शिव फाटा इथं अमली पदार्थांचा साठा जप्त करुन तिघा तरुणांना रत्नागिरी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणातले तिघेजण २० ते २३ वर्षांचे आहेत. त्यांच्याकडून तीन किलो ९५४ ग्रॅम गांजासह एक वाहन, तीन मोबाइल फोन्स आणि इतर साहित्य असा एक लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

<><><><><>

अस्ताना इथं सुरु असलेल्या कझाखस्तान आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत भारतीय खेळाडू अनुपमा उपाध्यायनं भारताच्याच ईशाराणी बारुआ हिचा पराभव करून विजेतेपद पटकावलं आहे.

**<><><><><>**